# जिल्ह्यातील पहिले 'फॉस' सेंटर फलटणच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात

▲ **कोळकी,** दि. ६ : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मुंबई आयआयटीच्या सहभागाने स्पोकन ट्युटोरियल अंतर्गत जिल्ह्यातील पहिले फॉस सेंटर फलटण एज्युकेशन सोसायटीच्या फलटण अभियांत्रिकी महाविद्यालयात सुरू करण्यात आले असून त्याचा लाभ विद्यार्थी, शिक्षक व प्राध्यापकांनी घ्यावा, असे आवाहन सोसायटीचे सेक्रेटरी श्रीमंत संजीवराजे नाईक-निंबाळकर यांनी केले.



**फॉस सेंटरच्या उद्घाटन प्रसंगी श्रीमंत संजीवराजे, प्राचार्य डॉ. सुभाष रसाळ, प्राचार्य डॉ. फडतरे, प्राचार्य निकम व इतर.**

या सेंटरच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. सोसायटीचे प्रशासनाधिकारी प्राचार्य अरविंद निकम, अधीक्षक श्रीकांत फडतरे, मुधोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सभाष रसाळ. अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. के. फडतरे, उमेश निंबाळकर उपस्थित होते.

मुंबई आयआयटीच्या स्पोकन ट्युटोरियल्स प्रोजेक्टच्या समन्वयक विद्या कदम यांच्याशी श्रीमंत संजीवराजे, प्राचार्य डॉ. फडतरे यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधून उपक्रमाविषयी माहिती घेतली. फॉस सेंटरच्या माध्यमातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपन्या, शिक्षणसंस्था, व्यक्तिगत संशोधनासाठी फ्री आणि ओपन सोर्स सॉफ्टवेअर उपलब्ध असल्याची माहिती केंद्र समन्वयक प्रा. रामदास बागवडे यांनी दिली.

प्रा. शांताराम काळेल यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सचिन पुकाळे यांनी आभार मानले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे विभागप्रमुख, प्राध्यापक, कमंचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

Dainik Akikya 07-05-2016 Page:05 (Satara)


DELL




Spoken Tutorial
Spoken Tutorial
Making India IT Literate
IIT BOMBAY
Workshop: Free workshops on Open Source software using Spoken Tutorial
National Mission on Education through ICT, MHRD, Govt. of India
http://spoken-tutorial.org
Contact us: contact@spoken-tutorial.org
Talk To A Teacher
FOSS Lab






DELL